# सिद्धिविनायक मेट्रो स्थानकाचे काम ८५ टक्के पूर्ण

**मुंबई :** मुंबईकरांचा प्रवास जलद आणि सुखकर व्हावा यासाठी शासनदरबारी विविध प्रयत्न करण्यात येत आहेत. पुणेपाठोपाठ मुंबईकरांनाही भुयारी मेट्रोचा आनंद लवकरच लुटता येणार आहे. कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ या मार्गात मेट्रोच्या दादर स्थानकाशिवाय सिद्धिविनायक, काळबादेवी, चर्चगेट आणि हुतात्मा चौक या स्थानकांचा समावेश असणार आहे. सिद्धिविनायक स्थानकाचे काम ८५ टक्के पूर्ण झाले असून या मेट्रोमुळे उत्तर मुंबई गाठण्यासाठी मुंबईकरांना मोठी मदत होणार आहे. तर दादर स्थानकाचे काम प्रगतिपथावर असून ट्रकचे काम १०० टक्के झाल्याचे मेट्रो प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ या ३३.५ किमीच्या भुयारी मार्गाची यशस्वी चाचणी करण्यात आल्याचे देखील मेट्रो प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.